तात्काळ
कायम विनाअनुदान

जा.क्र.माध्य.३/१४/नमाशा/पुवि/२००४ २२२६४१६०
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 30 SEP 2004

प्रति

सचिव,
श्री पार्श्वनाथ प्रज्ञालय,
तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे

विषय : २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ : १. शासन पत्र क्र. नमाशा/१००४/(५३०/२००४)/माशि-१, दिनांक २३.८.२००४
२. मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/१००२ के/नमाशा/६५१७०/१५-क, दि. २८.९.२०००

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री पार्श्वनाथ प्रज्ञालय, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे | तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे | आठवी | इंग्रजी |

**कायम विना अनुदान**

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

१. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही किंवा विद्यार्थ्यांच्या फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र सादर करावे.
२. सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
३. आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
४. आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु. २०/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे प्रतिस्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.
५. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
६. संस्थेविरुध्द गंभिर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
७. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
८. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबित नाही.
९. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.
१०. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २१०३/(५०/०३) माशि-२, दिनांक २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १० विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसाचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे.

स्वाक्षरीवर शि. उ. सं. यांची
सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.
करिता

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
आपण संबंधित अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.
२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ - यांना सविनय सादर
३. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२. यांना सविनय सादर

Jadhav E.O.(S)
9850155558
Rokde M.
26050733

Sandeep/ namasha-eng.04